जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र- ११० दिनांक :- २४/०८/२०२६

**" जिल्हापेठ पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी ; बसस्थानकातील चोरीचा छडा; दोन सराईत महिला आरोपी ताब्यात, एकुण १,०५,०००/- रुपयाचे सोन्याचे दागिने हस्तगत "**

===000===

दिनांक १८/०७/२०२६ रोजी सायंकाळी १६:३० वा. नवीन बस स्थानक, जळगाव येथे जळगाव ते चाळीसगाव जाणाऱ्या बसमध्ये फिर्यादी चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडीच्या इराद्याने फिर्यादी यांचे १० ग्रॅम वजनाची सोन्याची मणी मंगळसूत्र व ० ५ ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे टोंगल असे एकुण रु.४५,०००/- रुपये किंतीचे सोन्याचे दागिने चोरी करुन नेणे बाबत फिर्यादी यांचे फिर्यादीवरून दिनांक २०/०७/२०२६ रोजी सायंकाळी १७:५१ वा. जिल्हापेठ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. २२६/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२) 303(2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन **मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे** यांनी जिल्हापेठ पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक श्री. अनिल वाघ यांना सदर गुन्ह्याचा सखोल तपास करून आरोपींताचा शोध घेण्याबाबत तसेच गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शन व सूचना दिल्या. त्यानुसार सहा. पोलीस निरीक्षक श्री. अनिल वाघ यांनी आपले पोलीस स्टेशचे गुन्हे शोध पथकांतील अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक तयार करून आरोपींचा तात्काळ शोध घेणे व गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या

सदर गुन्ह्याच्या तपासासाठी जिल्हापेठ पोलीस ठाणे येथील गुन्हे शोध पथकाने घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक माहिती संकलित केली. तसेच पथकाकडून घटनास्थळ व परिसरातील CCTV फुटेजची पडताळणी करण्यात येत असताना, विश्वसनीय गोपनीय बातमीदारामार्फत सदर गुन्ह्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीची पडताळणी करून गुन्हे शोध पथकाने **महिला आरोपी १) उषा चंदन ससाणे, वय 48 वर्षे, रा. नारायणवाडी, इंदिरानगर, ता. चाळीसगाव, जि. जळगाव, ह.मु. हरिविठ्ठल नगर, जळगाव** व **२) अनिता विजय ससाणे, वय 35 वर्षे, रा. राजीव गांधी नगर, वाघ नगर, जळगाव** यांना ताब्यात घेतले.

सदर दोन्ही महिला आरोपी नात्याने **देराणी-जेठाणी** असून, त्यांच्याकडे कौशल्यपूर्ण व सखोल चौकशी केली असता त्यांनी जिल्हापेठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि. क्र. २२६/२०२६ सह गुन्हा रजि. क्र. १७३/२०२६ व २१२/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२) असे गुन्हे केल्याची देखिल कबुली दिली आहे.

सदर सराईत महिला आरोपींकडून खालीलप्रमाणे सोन्याचे दागिने पंचांच्या उपस्थितीत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून जप्त करण्यात आले आहेत.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचा तपशील :-

१. ४५,०००/- रुपये किंमतीचे अंदाजे ८ ते ९ ग्रॅम वजनाची सोन्याची मणी मंगळसूत्र असलेली पोत व अंदाजे ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे टोंगल

२. १५,०००/- रुपये किंमतीचे अंदाजे ४ ते ५ ग्रॅम वजनाची सोन्याची मणी मंगळसूत्र असलेली पोत

३. ४५,०००/- रुपये किंमतीचे अंदाजे ७ ते ८ ग्रॅम वजनाची सोन्याची मणी मंगळसूत्र असलेली पोत

-----------------------------------------------------------------------------------------------

एकूण १,०५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

तसेच सदर गुन्ह्याचा अधिक तपास करीत असताना, दोन्ही महिला आरोपींचे पूर्व गुन्हेगारी रेकॉर्ड तपासले असता, **अमळनेर पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. २३६/२०२१६ भा.दं.वि. कलम ३७९** तसेच **जळगाव शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ८०/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२)** त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच त्यांनी असुन गुन्हे केल्याची शक्यता नाकारता येत नसुन, सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोना/१०७८ संतोष सोनवणे- जिल्हापेठ पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदर कामगिरी मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री. संदिप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री. नितीन गणपुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अनिल वाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक तथा प्रभारी अधिकारी, जिल्हापेठ पोलीस ठाणे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोहवा/गणेश शिरसाळे, पोहवा/नरेश सोनवणे, पोहवा/महेंद्र पाटील, पोहवा/किरण वानखेडे, तेजस मराठे, पोलीस कॉन्स्टेबल/कमलाकर बडगुजर, प्रशांत सैंदाणे, अजय अहिरे, पोलीस कॉन्स्टेबल/अजय सपकाळे, पोलीस कॉन्स्टेबल/नरेंद्र दिवेकर, महिला पोलीस कॉन्स्टेबल वैशाली सोनवणे, महिला पोलीस कॉन्स्टेबल/सुषमा ढमढेरे, तसेच नेत्रम शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल मुबारक देशमुख व पोलीस नाईक/रुस्तम तडवी, जिल्हापेठ पोलीस ठाणे, जळगाव यांचे पथकाने कौशल्यपूर्ण व उल्लेखनीय कामगिरी केलेली

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**प्रति,**

**सर्व संपादक/वार्ताहार**
**प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया**
**२/- जनहितार्थ प्रसारण करीता**

*******************************************************************************


स्टेशन,
नि. जळगांव
दुरध्वनी क्रमांक :0257 222 9733